Recent Trends in Geography

(भूगोलशास्त्रातील आधुनिक विचार प्रवाह)



• संपादक •

प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार

प्रा. डॉ. विजय ब. खराते

Dr. Vedprakash Dongaonkar

Recent Trends in Geography

(भूगोलशास्त्रातील आधुनिक विचार प्रवाह)

संपादक

प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार

एम. ए. (भूगोल) बि.एड, एम. फिल, पिएच.डी, सेट

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम

प्रा. डॉ. विजय ब. खराते

एम. ए. (भूगोल), एम.पी.एड, एम. फिल, पिएच.डी, नेट व डी. वाय. एड.

कला व विज्ञान महाविद्यालय कामरगाव ता. कारंजा (लाड), जि. वाशिम

दयाधन पब्लिशर्स ग्रुप

दयाधन पब्लिशर्स ग्रुप,
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

Recent Trends in Geography
(भूगोलशास्त्रातील आधुनिक विचार प्रवाह)

संपादक
प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार
प्रा. डॉ. विजय ब. खराते

© सौ. मस्के अनिता दयाराम

आवृत्ती :- पहिली
प्रकाशिका
सौ. मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
Mob. No. 7276193979 (WhatsApp) Call 9371725117

Email Id: - dayadhanpublishersgroup@gmail.com
Website: - http://www.dayadhanpublication.com
मुद्रक
श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
प्रकाशन दिनांक 19/02/2022
ISBN 978-93-91097-44-8
किंमत 550/-

टीप:- प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क सौ. मस्के अनिता दयाराम यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखक/लेखिकाच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी संपादक, प्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.
न्यायाधिकरण:- जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

अ.क्रं.	शीर्षक	लेखक	पृष्ठ क्रं.
४१	नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि व्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास	डॉ. जयदीप रामकृष्ण सोळंके	२३९-२४४
४२	जल जीवन आणि तापमान	प्रा. डॉ. कलंदर मुस्तफा पठाण	२४५-२५०
४३	नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या समस्या व उपाय योजना भौगोलिक अध्ययन	मनीषा सुहास रामटेके	२५१-२५५
४४	नोर्जेलिंग, तिबेटियन कॅम्प, जिल्हा गोंदिया येथील सामाजिक, आर्थिक, लोकसंख्या शास्त्रीय स्थितीचा भौगोलिक अभ्यास	प्रा. दिपाली भा. दांडेकर डॉ. वनश्री एन. लाखे	२५६-२६७
४५	महाराष्ट्रातील कृषी व्यवसायात हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या समस्या एक भौगोलिक अभ्यास	श्री. दिलीप बा. देव्हडे	२६८-२७५
४६	शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा काळाची गरज	डॉ. सचिन एन. भोंबे	२७६-२८२
४७	जलसिंचन चंद्रपूर जिल्हा भौगोलिक अध्ययन	प्रा. डॉ. निखिल एम. देशमुख	२८३-२८८
४८	आपत्ती व्यवस्थापन व नियोजन	डॉ. राजकुमार जी. बोंडे	२८९-२९३
४९	ग्रामीण पर्यटन	प्रा. अभिजीत प्रभाकर दोड	२९४-२९८
५०	भारतीय दर्शनात महाभूतांची चर्चा	डॉ. वेदप्रकाश डोणगांवकर	२९९-३०५
५१	अमरावती जिल्ह्यातील संत्रा पिकांच्या बाजार भावांचे विश्लेषण एक भौगोलिक अभ्यास (२०११-२०१५)	गजानन अंबादास पाचपुते	३०६-३१२
५२	पर्यावरणातील ध्वनी प्रदूषण (Sound Pollution) एक समस्या	प्रा. डॉ. शशिकांत पी. दुपारे	३१३-३२०
५३	ऊर्जा संवर्धन काळाची गरज	प्रा. डॉ. केंद्रे डी. एस.	३२१-३२६
५४	अकोला जिल्ह्यातील वनक्षेत्र प्रदेश व वन प्रदेश आंतर्गत असलेल्या समाविष्ट घटकांचे भौगोलिक विश्लेषण	कु. श्रुती सूर्यकांत मालवीय, डॉ. यु. बी. मडावी	३२७-३३१

५०.भारतीय दर्शनात महाभूतांची चर्चा

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

तत्त्वज्ञान ही सर्व शास्त्रांची जननी आहे. तत्त्वज्ञानात प्रामुख्याने जीव, जगत आणि जगदेश्वराचा विचार केला जातो. भारतीय तत्त्वज्ञानातील सर्व दर्शनांच्या अभ्यासांती "जीव, जगत आणि जगदेश्वर हे तीन्ही मूळ तत्त्व आहेत", असे म्हणता येते. मात्र त्यासाठी भारतीय दर्शनांचे आपल्याला तीन भाग करावे लागतील. त्यात, "जीव, जगत आणि जगदेश्वर या तीन्ही तत्त्वांची एकत्रीतपणे चर्चा करणाऱ्या दर्शनांचा पहिला भाग. जीवाला महत्व देत जगताची चर्चा करणाऱ्या दर्शनांचा दुसरा भाग आणि जगदेश्वराला महत्व देत त्या जगदेश्वराचे प्रतिबिंब जीव व जगतात पाहणाऱ्या दर्शनांचा तिसरा भाग." अशा पद्धतीने भारतीय दर्शनांचे आपल्याला तीन भाग दर्शविता येतील. आता जेव्हा 'पंच महाभूतांचा' विषय आपल्या समोर येतो तेव्हा या तीन पैकी नेमक्या कोणत्या दर्शनांच्या भागात पंच महाभूतांची चार्चा झाली आहे ? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने विचार केला असता आपल्याला असे दिसून येते की, या तिन्ही भागातील ज्या ज्या दर्शनांनी आपल्या आपल्या प्रमुख विषयाला अनुसरुन चर्चा केली आहे, त्या त्या सर्व दर्शनांनी कमी जास्त प्रमाणात पंच महाभूतांची चर्चा केलेली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात वेद–उपनिषदांना षड्दर्शनांचा आधार मानले जाते. सांख्य, न्याय, वैशेषिक, योग, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा ही षड्दर्शन आहेत. याशिवाय चार्वाक, जैन, बौद्ध ही देखील प्रमुख दर्शन आहेत. यापैकी अनेक दर्शनांच्या अध्ययनातून 'पंच महाभूत' हा एक महत्वाचा विषय असल्याचे दिसून येते.

वेद हे भारतातलेच नव्हे तर जगातले सर्वात प्राचिन साहित्य आहे. वेद हे बहूदेवतावादी आहेत. वेदात इंद्र, मरूत, वायू, वात, आप, पर्जन्य, सोम, अग्नी, सरस्वती, पृथ्वी इत्यादीला देवतांच्या रूपात पाहिले आहे. या देवता प्रकृतीच्या कोणत्या ना कोणत्या रूपात आपल्याला जीवन जगण्यासाठी मदत करीत असतात. पंच महाभूतापैकी यात वायू, आप अग्नी आणि पृथ्वी हे भूत दिसून येतात. अथर्ववेदात "भूमे मातर्नि धेहि मा भद्रया सुप्रतिष्ठितम्।"[1] या शब्दात पृथ्वीला मातृत्वाचा दर्जा देण्यात आला आहे.

या शिवाय त्या ठिकाणी "पृथ्वी ही जलयुक्त आहे. पृथ्वीवर अषौध स्वरूपी अनेक प्रकारच्या वनस्पती, लता आहेत. पृथ्वीच्या गर्भात अनेक प्रकारचे रत्न, सुवर्ण आहेत. पृथ्वी आम्हाला आश्रय देणारी आहे. आमचे पोषण करणारी आहे."[2] अशा प्रकारचे वर्णन ही करण्यात आले आहेत.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत उपनिषदांना 'ज्ञानकांड' म्हणून ओळखले जाते. वेदाचा अंतिम भाग असल्या कारणाने उपनिषदांना 'वेदांत' असेही म्हणतात. उपनिषद ही संख्येने अनेक आहेत. बहुतांश उपनिषदांचा मुख्य विषय हा 'ब्रह्मज्ञान' (जगदेश्वर) आहे. ब्रह्मज्ञाानाच्या अनुषंगाने काही उपनिषदांमध्ये महाभूतांची चर्चा पहावयास मिळते. मुण्डकोपनिषदामध्ये परब्रह्मापासून भाव, प्राण, मन, इंद्रिय आणि पाच महाभूत उत्पन्न होतात, असे सांगितले आहे. त्याठिकाणी परब्रह्माला विराट मानले आहे. त्या विराटाचे वर्णन करीत असतांना त्याठिकाणी अग्नी, वायू, पृथ्वी या महाभूतांची चर्चा झाली आहे. या उपनिषदकारांनी अग्नीला विराटाचे डोके, वायूला प्राण तर पृथ्वीला पाद मानले आहे. अर्थात त्यांनी अग्नीच्या रूपाने ब्रह्मांडातील उष्ण भागाचा, वायूच्या रूपाने शीतल भागाचा आणि पृथ्वीच्या रूपाने थंड व उष्ण किंवा दमट भागाचा निर्देश केला असल्याचे दिसून येते.

तैत्तिरीयोपनिषदामध्ये ब्रह्म तत्त्वापासून पुरुष तत्त्वाची उत्पत्ती झाली, हे सांगत असतांना महाभूतांची चर्चा दिसून येते. या उपनिषदकारांनी परमात्मारूपी ब्रह्मापासून आकाश बनले असल्याचे सांगितले आहे. विशेष म्हणजे आकाशापासून वायू, वायूपासून अग्नी, अग्नीपासून जल, जलापासून पृथ्वी, पृथ्वीपासून सर्व औषधी (वनस्पती), वनस्पतीपासून अन्न आणि अन्नापासून पुरुष तत्त्वाची उत्पत्ती झाली असल्याचे त्यांनी सांगितले आहे. एका अर्थाने त्यांनी या निमित्याने पंच महाभूत हे कशा पद्धतीने एकमेकांपासून उत्पन्न झाले आहेत, या विषयीचे संकेत प्राचिन काळीच देऊन ठेवले आहेत.[3]

बृहदारण्यकोपनिषद हे एक महत्वाचे उपनिषद आहे. या उपनिषदाचा मुख्य विषयसुद्धा ब्रह्मज्ञान हाच आहे. मात्र ब्रह्माचे स्वरूप सांगत असतांना या उपनिषदकारांनी विविध दृष्टांत देत विविध विषय सूचविल्याचे दिसून येते. या ठिकाणी ते प्रामुख्याने संपूर्ण विश्व वा जगत आणि त्यात असलेले विविध घटक हे कशा पद्धतीने अद्वैत स्वरूप आहेत, किंवा कशा पद्धतीने ते सर्व घटक एकमेकांशी सलग्नीत आहेत हे दर्शविण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते मधाचे उदाहारण देतात. त्या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे जसे अनेक मधमाशा एकत्र येऊन पोळे तयार करतात. तसे पृथ्वी आदि सर्व

घटक एकत्र येऊन भूतांना आणि सर्व भूत आत्म्याला तयार करतात. आणि म्हणूनच ते अग्नी, जल, वायू, आदित्य, दिशा, चंद्र, विद्युत, मेघ, आकाश, धर्म, सत्य, मनुष्यजाति, आत्मा हे सर्व भूतांचे मधू आणि सर्व भूत हे त्या प्रत्येकाचे मधू आहे, असे ही म्हणतात.[4]

याच बृहदारण्यकोपनिषदात 33, 06, 03, 02, 1.5 (दिड) आणि 01 संख्येच्या देवतांचा उल्लेख झाला असल्याचे दिसून येत. या पैकी अग्नी, पृथ्वी, वायू, अन्तरीक्ष, आदित्य आणि द्युलोक या 06 देवतांचा एक समुह आहे. याशिवाय तीन लोकाच्या देवता म्हणून पृथ्वी व अग्नी, अंतरीक्ष व वायू, द्युलोक व आदित्य या 03 समुहाला देखील देवता म्हणून सूचविल्याचे दिसून येते.[5]

गीता हा महाभारताचा एक भाग आहे. पण असे असले तरिही गीतेत श्रीकृष्णाच्या माध्यमातून जे विचार व्यक्त झाले आहेत त्यावरुन गीतेचे एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे, असे म्हणता येते. गीतेत सांगितल्याप्रमाणे, परमेश्वर या जगताचे उपादान व निमित्त कारण आहे. ते बीजांना उत्पन्न करणाऱ्या प्रकृतीच्या पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार या आठ प्रकारांचा मूळ आधार आणि त्यांच्या बीजांचा पिता आहे. या ठिकाणी लक्षात घेण्याचा विषय हा आहे की, गीतेत पंच महाभूतांना प्रकृतिचे प्रकार आणि या सर्व प्रकारांचा अधार म्हणून परमेश्वर, या अर्थाने चर्चा झाली आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात वेद–उपनिषदांच्या नंतर दर्शनांचा विचार केला जातो. ज्यात सहा वैदिक आणि तीन अवैदिक दर्शन येतात. वैदिक दर्शनांपैकी सांख्य आणि वैशेषिक दर्शनांनी पंच महाभूतांवर सर्वाधिक भर दिला आहे. त्यांनी पंच महाभूतांना तत्त्वाच्या रूपात स्वीकारले आहे. सांख्य दर्शनकार प्रकृति आणि पुरुष या दोन तत्त्वांचा मूळ तत्त्व म्हणून स्वीकार करतात. ते प्रकृतिपासून इतर तेवीस तत्त्व उत्पन्न होत असल्याचे मानतात. त्यात ते आकाश, वायू, तेज, जल, पृथ्वी या पाच महाभूतांचा समावेश करतात. अनुक्रमे ही पाच महाभूते शब्द, स्पर्श, रूप, रस, गन्ध या पाच तन्मात्रांपासून उत्त्पन्न होत असल्याचे ते मानतात.[6] या अशा प्रक्रियेतूनच सृष्टिचा विकास होतो, अशी त्यांची भूमिका आहे. सांख्यांची ही भूमिका 'सांख्यांचा उत्क्रांतवाद' म्हणून प्रसिद्ध आहे.

भारतीय तत्त्वज्ञानात वैशेषिक दर्शन हे एक महत्वाचे दर्शन आहे. या दर्शनाचे प्रवर्तक महर्षी कणाद हे आहेत. भारतीयांच्या दृष्टिकोनातून महर्षी कणाद हेच खऱ्या अर्थाने भौतिकशास्त्राचे जनक आहेत. कणादाच्यानंतर प्रशस्तपाद यांनी या कणादाच्या भुमिकेचा विस्तार व विकास केला आहे.

वैशेषिक दर्शनात द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव या सात पदार्थांना तत्त्व रूपात स्वीकारले आहे. यापैकी पहिल्या 'द्रव्य' या पदार्थामध्ये पंच महाभूत, आत्मा व मन, दिक् व काल अशा नऊ तत्त्वांची चर्चा आढळून येते.

वैशेषिकांच्या मतानुसार, पृथ्वी हे पहिले द्रव्य आहे. रूप, रस, गन्ध, स्पर्श आणि या शिवाय संख्या, द्रवत्व, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, संस्कार हे पृथ्वीचे चौदा गुण आहेत. पाणी दुसरे द्रव्य आहे. रूप, रस, स्पर्श, स्निग्धपणा आणि याशिवाय द्रवत्व, स्नेह, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व, संस्कार हे पाण्याचे चौदा गुणधर्म आहेत. तेज म्हणजे अग्नी हे तीसरे द्रव्य आहे. रूप, स्पर्श आणि याशिवाय संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, द्रवत्व, संस्कार हे अग्नीचे आकरा गुणधर्म आहेत. वायू हे चौथे द्रव्य आहे. कणादांनी वायूचा स्पर्श हा एकच गुण असल्याचे सांगितले आहे. त्याच्या मते इतर द्रव्याप्रमाणे वायू हा इतर द्रव्यावर आश्रित नसतो. किंवा इतर द्रव्याच्या आश्रयाने वायू उत्पन्न ही होत नाही. परिणामी त्याचे नित्यत्व इतर द्रव्याच्या तुलणेत मुक्त असल्याचे मानावे लागते. वायू हा क्रियावान आणि गुणवान आहे. स्पर्श, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, संस्कार हे वायूचे नऊ गुण प्रशस्तपादांनी सांगितले आहेत. आकाश हे पाचवे द्रव्य आहे. रूप, रस, गन्ध आणि स्पर्श हे चार आकाशाचे गुण आहेत. याशिवाय शब्द, परिमाण, पृथक्त्व, संयोग आणि विभाग सुद्धा आकाशाचे गुण आहेत. यातला शब्द हा गुण अत्यंत महत्वाचा मानला जातो. पण या शब्द गुणाचे ज्ञान प्रत्याक्षाने नव्हे तर अनुमानाने होत असते. [7]

वैशेषिकांनी सांगितल्याप्रमाणे, या पाच महाभूतापैकी पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू या प्रत्येक द्रव्याचे काही नित्य परमाणु असतात. अशा या परमाणुच्या संयोगातून द्रव्याची निर्मिती आणि वियोगातून द्रव्याचा नाश होत असतो. विश्वाची निर्मिती ही परमाणुंनी युक्त असलेल्या द्रव्यापासून होत असते. म्हणून या परमाणुला विश्वाचे उपादान कारण म्हटले जाते.

उत्तरमीमांसा दर्शन हे ज्ञानकांडावर अर्थात उपनिषदांवर आधारित आहे. अर्थात उत्तरमीमांसा दर्शनाचा सुद्धा मुख्य विषय ब्रह्मच आहे. बादरायण व्यास हे या दर्शनाचे प्रवर्तक आहेत. त्यांनी ब्रह्माचे एक रूप म्हणून पुरुष तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. या पुरुष तत्त्वाचे भूत, पृथ्वी, शरीर व हृदय हे चार पाद आहेत. हे पाद आकाश, प्राण, ज्योति, अक्षर, गायत्री आदीचा निर्देश करतात. अशा प्रकारे बादराण ब्रह्म व पुरुषाच्या अनुषंगाने पृथ्वी

आणि आकाश या दोन महाभूतांची चर्चा करतांना दिसतात. उत्तरमीमांसा दर्शनात शंकराचार्यांचे महत्वाचे स्थान आहे. शंकराचार्य हे आत्म्याच्या वास्तविक स्वरूपाला समजून घेण्यावर भर देतात. कारण आत्म्याच्या वास्तविक स्वरूपातूनच ब्रह्म तत्त्वाचे ज्ञान होते असे ते मानतात. तेव्हा आत्म्याचे वास्तविक स्वरूप काय आहे हे सांगत असतांना ते पंच महाभूतांची चर्चा करतात. मात्र त्यांची ती चर्चा नकारात्मक स्वरूपाची आहे. कारण ते म्हणतात, "मी, मन, बुद्धी, अहंकार, चित्त नाही. कान, जीभ, नाक, डोळे नाही. आकाश, पृथ्वी, तेज, वायू नाही. तर मी आनंदस्वरूप शिव आहे." शंकराचार्यांच्या या भूमिकेवरुन ते कल्पनावादी असल्याचे जानवते. मात्र याचा अर्थ ते पृथ्वी आदि जड तत्त्वांचे अस्तित्वच अमान्य करतात असा होत नाही. कारण ते जगताची व्यावहारिक सत्ताही स्वीकारतात आणि जगताच्या या व्यावहारिक रूपात पंच महाभूते समामिष्ठ असतात.

भारतीय तत्त्वज्ञानात चार्वाक हे एक अवैदिक दर्शन आहे. सामान्यतः चार्वाक हे जडवादी दर्शन म्हणून ओळखले जाते. मात्र त्यांचा हा जडवाद अत्यंत शुद्ध स्वरूपाचा असल्याचे म्हणता येत नाही. कारण ते जडापासून चैतन्याची उत्पत्ती होते असे मानतात. या संदर्भात सर्वदर्शनसंग्रहात माधवाचार्य लिहितात, "किण्व (गूळ) आदी पदार्थापासून मद वा मादक पदार्थ जसा तयार होतो. तसेच पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू ही तत्त्व जेव्हा देहाच्या आकारात परिणत होतात तेव्हा त्यापासूनच चैतन्यही निर्माण होते. "[8] या आधारेच 'चैतन्य विशिष्ट देह म्हणजे आत्मा होय,' ही चार्वाकाची भूमिका सर्व परिचित आहे.

चार्वाक पृथ्वी, अग्नी, वायू आणि जल या महाभूतांना तत्त्वाच्या स्वरूपात स्वीकारतात. ते आकाशाचा स्वीकार करीत नाहीत.[9] कारण ते आकाशाचे प्रत्यक्ष ज्ञान होत नाही असे मानतात. जगताच्या निमिर्तीमध्ये ते आकाशाला सोडून इतर चार महाभूतांना महत्व देतात. वास्तविक पाहता पृथ्वी, अग्नी, वायू आणि जल या चारही महाभूतांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. पण ज्याप्रमाणे पान, कात, चूना हे वेगवेगळया गुणर्धाचे असतांनाही त्यांच्यात संयोग घडतो आणि लाल रंगाची उत्पत्ती होते त्याप्रमाणे पृथ्वी, अग्नी, वायू आणि जल या वेगवेगळया गुणधर्म असलेल्या महाभूतांमध्ये संयोग होऊन आत्म्याची निर्मिती होत. चार्वाकांची ही भूमिका जगताच्या संदर्भात देखील लागू पडते. अर्थात जगताच्या निर्मितीसाठी सुद्धा चार महाभूत हेच कारण आहेत, असे चार्वाक मानतात.

चार्वाकांप्रमाणे जैन दर्शन देखील अवैदिक दर्शन आहे. जैनांच्या मतानुसार, जीव आणि अजीव हे दोन प्रमुख तत्त्व आहेत. ते जीवाचे तात्त्विक आणि व्यावहारिक असे दोन प्रकार करतात. तात्त्विक जीव हा मुक्त असतो. व्यावहारिक जीवांना मात्र बंधनाचा अनुभव येत असतो. व्यावहारिक जीवाचे स्थावर आणि त्रस्त असे दोन प्रकार आहेत. स्थावर जीवांच्या संदर्भाने जैन दर्शनात पाच महाभूतांची चर्चा झाली आहे. त्याठिकाणी सांगितल्याप्रमाणे स्थावर जीवांना फक्त एक इंद्रिय असते. पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्नीकायिक, वायूकायिक आणि वनस्पतीकायिक हेच ते एकेंद्रिय जीव आहेत. जैन दर्शनात आकाशकायिक जीवाची चर्चा झालेली नाही. मात्र याचा अर्थ जैन आकाशाचे अस्तित्व अमान्य करतात असा होत नाही. कारण ते पुदगाचे अस्तित्व स्वीकारतात. पुदगल हे परमाणु सारखे पदार्थ आहेत. हे पुदगल जेथे व्यापुन असतात तेच एका अर्थाने जैनांचे आकाश (अवकाश) होय.

बौद्ध दर्शन देखील अवैदिक दर्शन आहे. बौद्ध दर्शन हे खऱ्या अर्थाने मानवी जीवनातील दुःख कसे कमी करता येईल ! या अनुषंगाने विचार करणारे दर्शन आहे. म्हणून पंच महाभूताच्या संदर्भाने विशेष अशी चर्चा झालेली दिसून येत नाही. पण डॉ. भीमराव आंबेडकर यांनी पुर्नजन्म संकल्पनेला अनुसरुन बुद्धांच्या काही विचारांच्या आधारे पंच महाभूतांची चर्चा केली असल्याचे दिसून येते. ते लिहितात त्याप्रमाणे, ''भगवान बुद्धाच्या मते, माणसाच्या अस्तित्वाचे चार घटक पदार्थ आहेत; पृथ्वी, आप, तेज, वायू हेच ते चार घटक होत. हे घटक पदार्थ आकाशात जे समान पदार्थ सामूहिक रूपाने आहेत त्यात मिसळून जातात. ह्या चार घटकांचे आकाशात तरंगणाऱ्या व तिथे विद्यमान असणाऱ्या महाभूतांचे (Mass) पुनर्मिलन होते. तेव्हा एक नवा जन्म घडतो. पुनर्जन्माचा भगवान बुद्धांना अभिप्रेत असणारा अर्थ हा असा आहे. या नव्या जन्मातील घटक पूर्वीच्या एका विशिष्ट मृत शरीरातील काही घटक असू शकतील.''[10] एकंदर डॉ. आंबेडकरांनी लिहिल्याप्रमाणे, बुद्ध महाभूतांचे अस्तित्व स्वीकारतात, ते त्यांच्यात मिलन वा संयोग होत असल्याचेही सुचवितात. विशेष म्हणजे त्या संयोगातून काहीतरी नविन उत्पन्न होते आणि त्यालाही काहीतरी पार्श्वभुमि असते, याकडेही ते लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात.

अशा प्रकारे भारतीय तत्त्वज्ञानात वेदांपासून ते दर्शनांपर्यंत अनेकांनी कुठल्याना कुठल्या स्वरूपात पंच महाभूतांची चर्चा केली असल्याचे दिसून येते. या ठिकाणी लक्षात घेण्यासारखा मुद्या हा आहे की, आपल्याकडे

सामान्यतः पृथ्वी, अग्नी, जल, वायू आणि आकाश या महाभूतांना एका भौतिक वा पर्यावरणीय घटकाच्या रूपातच पाहिले जाते. मात्र तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहिले असता, हे सर्व महाभूत केवळ भौतिक वा पर्यावरणीय घटक नाहीत तर ते ईश्वरिय घटक सुद्धा आहेत. या महाभूतांचा आणि मानवी अस्तित्वाचा अत्यंत निकटचा संबध आहे. या प्रत्येक महाभूतांचा एक स्वतंत्र गुणधर्म आहे. यांच्यात संयोग आणि वियोग होत असतो. इत्यादी वेगवेगळया बाबींची सुद्धा आपल्याला चर्चा करता येते.

संदर्भ :

1) अथर्ववदे, 12/1/63
2) अथर्ववेद, 12/1/1
3) तैत्तिरीयोपनिषद 2/1/1
4) बृहदारण्यकोपनिषद 2/5/1 ते 15
5) बृहदारण्यकोपनिषद 3/9/1 ते 9
6) सांख्यकारिकाः 22 व त्यावरचे गौडपादाचार्य यांचे भाष्य
7) वैशेशिक सूत्र – 2/1/1 ते 5, 2/1/11 ते 17, 27 आणि पदार्थ धर्मसंग्रह – .4/1 ते 6
8) डोणगावकर (डॉ) वेदप्रकाश, भारतीय तत्त्वज्ञान, मैत्री प्रकाशन, लातूर, 2020,पृ. 112
9) पृथिवी–आप–तेज–वायुः इति तत्त्वानी ।
10) आंबेडकर (डॉ.) भीमराव, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, बानाई, नागपूर 2016, पृ. 222